# मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
## प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष

शेती महामंडळ बिल्डींग, 270 भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, सिंबॉयसीस कॉलेज जवळ, पुणे-411016
फोन नं.020-25656577 / 78, ई-मेल-pcmu.smart@gmail.com, वेबसाईट-www.smart-mh.org


जा. क्र./पी सी एम यु /स्मार्ट/CBOमु.मा. /५५७ /२०२३ दि.२१ /०३/२०२३

प्रति,

१. नोडल अधिकारी, PIU- कृषी, स्मार्ट प्रकल्प, कृषी आयुक्तालय, पुणे
२. नोडल अधिकारी, PIU-पशुसंवर्धन, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे
३. नोडल अधिकारी, PIU- MAVIM, मुंबई.
४. नोडल अधिकारी, PIU- MSRLM, मुंबई.
५. नोडल अधिकारी, PIU- VSTF, मुंबई.

**विषय:**- स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्राथमिक मान्यता प्राप्त व सविस्तर आराखडा मंजूर असलेल्या FPC चे वर्गवारी करणेबाबत...

माहे डिसेंबर २०२२ मध्ये जागतिक बॅंकेकडून स्मार्ट प्रकल्पाचा इंप्लिमेंटेशन सपोर्ट मिशनव्दारे आढावा घेण्यात आला सदर आढाव्या दरम्यान झालेल्या चर्चेनुसार ज्या समुदाय आधारित संस्थांना स्मार्ट प्रकल्पांतर्गत मंजूरी मिळाली आहे, अशा सर्व संस्थांना तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देणेबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत. यासाठी समुदाय आधारित संस्थांच्या क्षमता बांधणीची गरज निश्चित करण्याच्या दृष्टीने स्मार्ट प्रकल्पांतर्गत सहभागी असलेल्या सर्व समुह आधारित संस्थाची वर्गवारी करण्याची प्रक्रिया राज्यस्तरावरून सुरू करण्यात आली आहे. समुह आधारित संस्थांच्या आर्थिक सामाजिक तसेच व्यवसायीक सक्षमतेचा आढावा या वर्गवारीच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. सदर विश्लेषणातून उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या आधारे संबंधित संस्थाच्या क्षमता बांधणीसाठी आवश्यक कार्यवाही करणे शक्य होईल. तसेच प्रकल्पाच्या विविध उपक्रमामुळे संस्थेला झालेला लाभ तसेच संस्थेची प्रगती यांचे सनियंत्रण करणे शक्य होईल. सदरील कामाची जबाबदारी विभाग स्तरावरील अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तीय सल्लागार तसेच जिल्हास्तरावरील अर्थशास्त्रज्ञ तथा वित्त प्रवेश सल्लागार यांना देण्यात आली आहे. तसेच सदर प्रश्नावली भरण्याबाबत ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन प्रस्तुत कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

तरी सदर विषयाचे महत्व लक्षात घेवून आपल्या अधिनस्त क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांना सदर उपक्रमामध्ये सहकार्य करणेबाबत आपल्या स्तरावरून सुचना निर्गमित कराव्या.

(कौस्तुभ दिवेगावकर)
प्रकल्प संचालक,
स्मार्ट प्रकल्प, पुणे